# 'बॅकलॉग' परीक्षा सुरू

## कार्यक्षेत्रात २९३ महाविद्यालये; २०० अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टन्सिगचे सर्व नियम पाळत शिवाजी विद्यापीठाच्या वतीने गुरुवारपासून बॅकलॉगच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे.




विद्यापीठ परीक्षा विभागाकडून कोरोना काळात कमी मुनष्यबळ असतानादेखील बॅकलॉगच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन करण्यात आले. महाविद्यालय स्तरावर गुरुवारपासून (दि.१) बॅकलॉगच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या २०० हून अधिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. महाविद्यालयांना ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षा घेण्याची मुभा देण्यात आली आहे. महाविद्यालयांनी परीक्षा वेळापत्रक तयार केले असून प्रश्नपत्रिका काढल्या आहेत.

बॅकलॉगच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर असल्याने सकाळपासून विद्यार्थ्यांची गर्दी होती. विद्यार्थ्यांना मास्क, सॅनिटायझर बंधनकारक करण्यात आले होते.

परीक्षा हॉलमध्ये जाताना विद्यार्थ्यांच्या शरीराचे तापमान मोजण्यात आले. एका वर्गात २० ते २५ विद्यार्थी व एका बाकावर एकच विद्यार्थी बसविण्यात आला होता. ५० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाची एक तासाची परीक्षा घेण्यात आली. पर्यवेक्षकांना मास्क, सॅनिटायझर यासह हँडग्लोव्हज देण्यात आले होते. परीक्षांचे गुण विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंक भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ९ ऑक्टोबरपर्यंत बॅकलॉगच्या परीक्षा चालणार आहेत. परीक्षा व्यवस्थित सुरू झाल्या असून कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# कुलगुरू पदासाठी शनिवारी मुलाखती



## शिर्के, देसाई, काळे, कुरणे, कुंभार यांचा समावेश

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी पाच जणांच्या पाच ऑक्टोबरला मुलाखती होत आहेत. विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, एनएमआयएमआयचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. के. व्ही. काळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. अंजली कुरणे व डॉ. अविनाश कुंभार मुलाखतीस सामोरे जाणार आहेत. विद्यापीठाच्या तेराव्या कुलगुरूपदी कोण विराजमान होणार, याची उत्सुकता आहे. कुलपथी तथा राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांच्या उपस्थितीत मुलाखती होणार आहेत. माजी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के जिल्ह्यातील उमेदवार असून, त्यांना विद्यापीठ कामकाजाचा अनुभव आहे. त्यांनी प्रभारी कुलसचिव म्हणून काम पाहिले आहे. त्याचबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासमवेत प्र-कुलगुरुपदाची जबाबदारी सांभाळली आहे. डॉ. देसाई मूळचे आजरा तालुक्यातील असून, ते विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी आहेत. डॉ. जी. बी. दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच. डी. पूर्ण केली. पाच उमेदवारांत या दोघांचा समावेश असल्याने कुलगुरूपदाकडे लक्ष लागले आहे.

# कुलगुरुपदाच्या सोमवारी अंतिम मुलाखती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या अंतिम ५ उमेदवारांच्या मुलाखती सोमवारी होणार आहेत. कुलपती (राज्यपाल) ऑनलाईन पद्धतीने या मुलाखती घेणार आहेत. विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, एनएमआयएमआयचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. के. व्ही. काळे, पुणे विद्यापीठाच्या डॉ. अंजली कुरणे, डॉ. अविनाश कुंभार यांचा अंतिम पाच जणांच्या यादीमध्ये समावेश आहे.



- **शिर्के, देसाई, काळे, कुंभार, कुरणे यांचा समावेश**
- **कुलपती घेणार ऑनलाईन पद्धतीने मुलाखती**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु निवड प्रक्रियेस शनिवार पासून प्रारंभ झाला. कुलपती कार्यालयाकडून कुलगुरु निवड प्रक्रियेअंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमली आहे. कुलगुरु पदासाठी १६९ जणांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केले होते. अर्जांच्या छाननीनंतर कुलगुरु शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २८ जणांची नावे निश्चित केली. या उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती शनिवारी पार पडल्या. यानंतर शोध समितीने अंतिम पाच उमेदवारांची नावे निश्चित केली असून ती नावे राज्यापालांकडे पाठविण्यात आली आहेत. यामध्ये डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. के. व्ही. काळे, डॉ. अंजली कुरणे, डॉ. अविनाश कुंभार यांचा समावेश आहे. या पाच उमेदवारांच्या सोमवारी ऑनलाईन पद्धतीने मुलाखती पार पडणार आहेत. या पाच उमेदवारांमधून कोणाची वर्णी कुलगुरुपदी लागणार याची उत्सुकता लागून राहिली आहे.

# कुलगुरू पदासाठी सोमवारी मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पदासाठी येत्या सोमवारी (दि. ५) पात्र पाच उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत. त्याअनुषंगाने संबंधित उमेदवारांना राज्यपाल भवनकडून गुरुवारी ई-मेल प्राप्त झाले आहेत.

कुलगुरू निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. १६९ इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यामधून कुलगुरू शोध समितीकडून



शिवाजी विद्यापीठातून...

२५ पात्र उमेदवारांच्या मुलाखती ऑनलाईन मुलाखती घेतल्या. यातून पात्र पाच उमेदवारांची नावे राज्यपाल कार्यालयास सादर करण्यात आली होती. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह डॉ. नितीन देसाई, डॉ. कारभारी काळे, डॉ. अविनाश कुंभार व डॉ. अंजली कुरणे यांचा समावेश आहे. सोमवारी राज्यपाल या पाच उमेदवारांच्या वेगवेगळ्या वेळेत ऑनलाईन मुलाखती घेतील. त्यानंतर राज्यपाल एकाची कुलगुरूपदी निवड करतील. कुलगुरूपदी कोणाची वर्णी लागते, याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# शिर्के, देसाई यांच्यासह पाचजणांच्या सोमवारी मुलाखती

## शिवाजी विद्यापीठ कुलगुरुपद निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती सोमवारी (दि. ५) कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्याकडून घेतल्या जाणार आहेत. या उमेदवारांमध्ये विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्चे विज्ञानशाखेचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई यांच्यासह पाचजणांचा समावेश आहे. त्यांच्या मुलाखती ऑनलाईन होणार आहे.

तीन दिवसांपूर्वी कुलगुरु शोध समितीने अंतिम पाच उमेदवारांची नावे कुलपती कोश्यारी यांना सादर केली. त्यात डॉ. शिर्के, डॉ. देसाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. के. व्ही. काळे, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील डॉ. अंजली कुरणे, प्रा. डॉ. अविनाश कुंभार यांचा समावेश होता. मुलाखती सोमवारी होणार असल्याचे कुलपती कार्यालयाकडून गुरुवारी माध्यमातून कळविले.

### यापूर्वी मुलाखती दिलेले उमेदवार

यातील डॉ. काळे यांनी आतापर्यंत तीनवेळा, डॉ. देसाई आणि डॉ. कुरणे यांनी एकवेळ अन्य विद्यापीठांच्या कुलगुरुपदासाठी मुलाखत दिली आहे. डॉ. शिर्के आणि डॉ. कुंभार यांची पहिल्यांदाच अंतिम पाच उमेदवारांमध्ये निवड झाली आहे.

ऑनलाईन पद्धतीने मुलाखती होणार असून त्यासाठीची वेळ त्यांना सांगितली. या उमेदवारांमधील तिघेजण हे कोल्हापूरशी संबंधित आहेत. त्यांतील डॉ. शिर्के यांचे मूळ गाव वाठार तर्फ वडगाव आहे. डॉ. देसाई हे तळेवाडी (ता. गडहिंग्लज) येथील असून डॉ. कुरणे या शिवाजी पेठ (कोल्हापूर) येथील आहेत. डॉ. कुंभार हे मूळचे इस्लामपूर (जि. सांगली) येथील आहेत.